**Goan Varta, Thursday 19 September 2019**

# अळंबी कार्यशाळेला नार्वेत प्रतिसाद; बीज प्रात्यक्षिकावर मार्गदर्शन

वार्ताहर। गोवन वार्ता

**केरी-सत्तरी :** सुळकर्णे येथील डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नार्वे गावातील लोकांना तंत्र वापरून अळंबी कशी तयार करता येतात, यावर मार्गदर्शन केले.

नार्वे येथील ग्रामपंचायत सभागृहात हे मार्गदर्शन पार पडले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून गावच्या पंच प्रतिष्ठा मिशाळ उपस्थित होत्या. सलोनी पाटील हिने स्वागत करून अळंबीबद्दल थोडक्यात माहिती सांगितली. पूजा फडते हिने तण(गवत) वापरून अळंबी कशी तयार करता येतात, याचे प्रात्यक्षिक दाखविले. त्यांनी ऑईस्ट्रस अळंबीची प्लुरोटस साजोर काजू पिंक ही व्हरायटी वापरली होती. या व्हरायटीचे पीक जास्त असते. तसेच त्याची वाढ लवकर होते. बटण अळंबीपेक्षा ऑईस्ट्रस अळंबीत जास्त पोषण असते. तसेच या प्रक्रियेस जास्त खर्च येत नाही. सोप्या पद्धतीने अळंबी उत्पादन करता येते.

यानंतर विद्यार्थ्यांनी बीज प्रक्रियेवर प्रात्यक्षिक दाखविले. झाडांना रोग, कीड लागू नये म्हणून बीज प्रक्रिया महत्त्वाची असते. बीज प्रक्रियेसाठी त्यांनी ट्रायकोडर्मा, रायझोबियम, कार्बेनडोजीम तसेच फॉस्फोरस सोल्युबलाइजिंग बॅक्टरिया याचा वापर केला. अशा प्रक्रियेमुळे झाडांना रोग लागत नाही व उत्पन्न चांगले मिळते.





अळंबीचे प्रात्यक्षिक दाखविताना सुळकर्णे येथील डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी. दुसऱ्या छायाचित्रात तयार केलेली अळंबी. (राघोबा पेडणेकर)